# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of Sociology

## Assignment

## Session: 2020 – 2021

M T W T F S S
Page No.:
Date:
YOUVA

~~नाव संगीता हरिप्रसाद सोनी~~

Yashoda Girls College

Name :- Sangeeta Soni

Sub :- Sociology
Std :- B.A 2nd III Sem
2020 - 2021

Assignment

Student Sangeeta Soni    menter Dr. Sonka Sir

Principal
Yashoda Girls Arts & Commerce
College, Sneh Nagar, Nagpur-15

SEAL

# विज्ञानाचे सोपान (संस्तरण)

(Hierarchy of Sciences)

'पॉझिटिव्ह फिलॉसॉफी' (Positve Philosophy) या ग्रंथात कॉम्टने ज्ञान आणि विज्ञानांचे एक व्यवस्थित वर्गीकरण आणि सोपान (संस्तरण) प्रस्तुत केले आहे. विज्ञानाच्या वर्गीकरणाचा विचार कॉम्टने संत सायमन यांच्यापासून घेतला आहे असे असले तरी कॉम्टचे वर्गीकरण हे सायमन यांच्यापेक्षा अधिक वैज्ञानिक आणि वेगळ्या प्रकारचे आहे.

विज्ञानाच्या वर्गीकरणामागील कॉम्टचा उद्देश हा समाजशास्त्राला एक नवीन विज्ञानाच्या रूपात व्यवस्थित आधार निर्माण देणे हा होता.

ज्यामुळे समाजशास्त्र हे विशिष्ट विज्ञानाच्या रूपात विकसित होऊ शकेल आणि इतर सामाजिक विज्ञानांमध्ये आपले एक महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त करू शकेल.

कॉम्टने सर्व विज्ञानाच्या विकासक्रमाच्या एक निश्चित सिद्धांत देखील प्रतिपादन केला आणि विज्ञानाचे उच्च किंवा

त्याच्या क्रमामध्ये सोपान (संसारण) प्रस्तुत केले. प्रत्येक विज्ञानाच्या विकासाच्या स्थितीस स्पष्ट करून समाजशास्त्राचा इतर विज्ञानाच्या शाखेशी संबंध प्रस्थापित करण्याचा कॉम्तचा हेतू होता. समाजशास्त्र हे एक नवीन आणि जटिल विज्ञान आहे.
ज्याचे विषयक्षेत्र हे इतर विज्ञानाच्या तुलनेत अधिक व्यापक आहे.
हे सिद्ध करणे हा कॉम्तचा उद्देश होता.
या वर्गीकरण किंवा सोपानाचा प्रमुख उद्देश समाजशास्त्रास सामाजिक विज्ञानाच्या रूपात प्रस्थापित करणे हा होता.
या संदर्भात बोगार्डस म्हणतात, की, 'विज्ञानाच्या वर्गीकरणाच्या आधारे कॉम्तने समाजशास्त्रास नवीन परंतु सर्वश्रेष्ठ विज्ञानाच्या स्वरूपात प्रस्तुत केले आहे.'

विज्ञानाच्या सोपानाचे सिद्धांत किंवा आधार :-

कॉम्त यांनी विज्ञानांचे सोपान परावलंबित्व किंवा निर्भरतेच्या (Dependence) अभिवृद्धक्रमाचा सिद्धांत आणि घटत असलेली सामान्यतः व घटत जाणाऱ्या जटिलतेच्या सिद्धांत या दोन सिद्धांताच्या आधारे स्पष्ट केले आहे.

2) निरंतरच्या (परावलंबित्व) वृद्धिक्रमाचा सिद्धांत (principles of Order of Increasing Dependence) :- कॉम्तद्वारे प्रतिपादीत या सिद्धांतानुसार ज्ञान किंवा विज्ञानाची प्रत्येक शाखा ही पूर्वीच्या विज्ञानावर अवलंबून असते.

जे ज्ञान किंवा विज्ञान प्रथम अस्तित्वात आले ते मात्र कोणत्याही विज्ञानावर आधारीत नव्हते.

त्या नंतर जे दुसरे विज्ञान विकसित होईल ते पहिल्या विज्ञानावर आधारीत असेल. त्यानंतर तिसरे विज्ञान हे पहिल्या आणि दुसऱ्यावर आणि चौथे विज्ञान दुसऱ्या आणि तिसऱ्या विज्ञानावर अवलंबून असेल.

अशाप्रकारे प्रत्येक नवीन विज्ञान हे त्यापूर्वी विकसित झालेल्या विज्ञानावर अवलंबून राहील. आणि याच क्रमाने विज्ञानाच्या प्रत्येक शाखेच्या परावलंबित्वामुळे वृद्धी किंवा निरंतरच्या वृद्धिक्रमाचा सिद्धांत असतो असे कॉम्त म्हणतो.

कॉम्तच्या मते, जे विज्ञान जितके अधिक प्रमाणात इतर विज्ञानावर अवलंबून असेल ते तितकेच अधिक नवीन मानले जाईल.

थोडक्यात, विज्ञानाच्या वर्गीकरण आणि सोपानमध्ये प्रत्येक विज्ञानाची श्रेणी ही पूर्वीच्या विकसित श्रेणीच्या नियम आणि सिद्धांतावर अवलंबून असते.

याचा परिणाम असा होतो की, विज्ञानाची एक शाखा नवीन विकासाबरोबर विज्ञानाच्याच दुसऱ्या शाखेवर परावलंबी होत जाते.

२) घटत जाणारी सामान्यता आणि वाढत जाणाऱ्या जटिलतेचा सिद्धांत (Principles of Decreasing Generality and Increasing Complexity):

कॉम्ट यांनी विज्ञानाच्या वर्गीकरणामध्ये घटत जाणारी सामान्यता आणि वाढत जाणाऱ्या जटिलतेच्या सिद्धांताचा आधार घेतला आहे.

या सिद्धांतानुसार प्रत्येक विज्ञानाची स्थिती वस्तुतः त्याच्या विषय वस्तूच्या आधारावरच निश्चित केली जाते.
त्यानुसार ज्या विज्ञानाची विषय वस्तू जितकी सोपी असेल तितके ते विज्ञान कमी परावलंबी असेल.

कारण सोप्या आणि सामान्य घटनांचे अध्ययन करणारे विज्ञान हे प्रथम निर्माण

उत्तर :

ज्या विज्ञानाची विषयवस्तू जितकी जटिल असेल तितके ते विज्ञान दुसऱ्या विज्ञानावर अधिक आधारित असेल. विशेष म्हणजे समाजाच्या विकास आणि ज्ञानाच्या प्रगतीबरोबरच जटिलता देखील वाढत जाते.

कॉम्ट याचे सिद्धांताच्या आधारे स्पष्ट करतो की, जे विज्ञान सर्वात प्रथम अस्तित्वात आले ते अधिक सामान्य आणि सर्वात कमी जटिल तसेच सर्वात कमी विषयाशी संबंधित होते.

त्यानंतर येणारे विज्ञान हे उत्तरोत्तर कमी सामान्य आणि अधिक जटिल होत गेले. कारण साध्या घटनांच्या प्रभावातून दुसऱ्या घटना निर्माण होतात आणि त्या क्रमशः जटिल होत जातात.

म्हणून घटना उत्तरोत्तर क्रमाने जटिल होत जातात आणि त्यांचे अध्ययन करणारे विज्ञान देखील क्रमशः जटिल होतात.


कॉम्ट स्पष्ट करतो की, प्रत्येक विज्ञान हे त्या पूर्वीच्या विज्ञानावर केवळ अवलंबूनच राहत नाही तर नवीन शोधाद्वारे ते पूर्वीच्या विज्ञानास समृद्ध देखील करतात.

म्हणून सर्वाधिक जटिल आणि विशिष्ट विज्ञानाच्या सोपान किंवा संस्तरणामध्ये ते

M T W T F S S
Page No.:
Date:
YOUVA

शेवटी राहतात.
वरील दोन सिद्धांताच्या आधारे संपूर्ण विश्वाचा संस्तरणात्मक क्रम क्रमाने पुढीलप्रमाणे दर्शविला आहे.

# विज्ञानांचे सोपान (संस्तरण)



(२) गणित विज्ञान (Mathematics) :-

कॉम्टच्या मत, 'गणित प्राचीन पहिले आणि आधारभूत आहे आणि असा दावा करता येईल की, सर्व विज्ञानांमध्ये हे पूर्ण किंवा निर्दोष विज्ञान आहे.

(Mathematics is the oldest, first and basic Sciences and can Clain the highest perfection among all other Sciences)

गणित विज्ञान हे सर्व विज्ञानांपेक्षा सामान्य घटनांचे अध्ययन करणारे विज्ञान आहे.
हे एक मौलिक उपकरण आहे.
आणि संपूर्ण विज्ञानाचा विकास याच मौलिक उपकरणाच्या आधारावर झाला आहे.
सर्व विज्ञानाच्या संशोधनाच्या क्षेत्रात गणिताच्या आधारावरच योग्य माप आणि विविध तथ्यांचा सुनिश्चित संबंध दर्शविणे शक्य आहे.
पुढे कॉम्ट स्पष्ट करतो की, गणित विज्ञानाद्वारे सामाजिक आणि साध्या नैसर्गिक घटनांच्या संदर्भात संशोधन आणि नियमांचा शोध घेणे संभव आहे.
गणित विज्ञानाशिवाय सर्व विज्ञान हे अपंग आहेत.

म्हणून सर्व विज्ञानाचा आधार गणित

विज्ञान आहे.
गणित विज्ञान हे सर्वात पहिले विज्ञान आणि साध्या घटनांचे अध्ययन करणारे विज्ञान असल्यामुळे हे इतर विज्ञानावर सर्वात कमी प्रमाणात अवलंबून आहे.
कॉम्तच्या मते, गणित विज्ञानाच्या अंतर्गत अंकगणित (Arithmatic), बीजगणित (Algebra), रेखागणित (Geomentry) आणि यंत्रविज्ञानाच्या (Mechanics) शास्त्रांचा समावेश होतो.
सर्व विज्ञान हे धार्मिक, तात्विक आणि विज्ञान या तीन मानवी चिंतनाच्या स्तरातून जातात.
परंतु गणित विज्ञानाने चिंतनाच्या स्तरात प्रवेश केला आहे.

(२) खगोल विज्ञान (Astronomy) :- कॉम्त यांनी इतर विज्ञानांच्या क्रमास स्पष्ट करतांना सर्व नैसर्गिक घटनांचे -
१) अजैविक (Inorganic) आणि
२) जैविक (Organic) अशा दोन प्रकारात विभाजन केले आहे.
तसेच अजैविक घटना घटनांचे -
अ) खगोलीक आणि
ब) भूमीवरील (Terestrial) घटना अशा दोन उप- विभागात विभाजन केले आहे.
खगोलीक घटनांमध्ये अत्यंत सामान्य

घटना दिसतात.

ज्याचा संबंध सूर्य, चंद्र, तारे, उल्का, ग्रह आणि उपग्रहाशी असतो.
खगोल विज्ञानात ग्रह, उपग्रह आणि नक्षत्रांच्या ब्रह्मांडामध्ये स्थिती, त्यांचे पारस्परिक अंतर, पृथ्वी-पासून अंतर, पारस्परिक आकर्षण आणि आकाशातील घटनांचे अध्ययन केले जाते.
आकाशातील ताऱ्यामध्ये सर्वात कमी प्रमाणात परिवर्तन होते.
त्याशिवाय यामध्ये पृथ्वीवरील (भूमी) पदार्थांच्या तुलनेत अधिक यथार्थता आणि निश्चितता आढळून येते.

खगोल विज्ञानाच्या माध्यमातून सूर्य, चंद्र, पृथ्वी, मंगळ, बृहस्पती इत्यादी ग्रहांच्या गतिविधींचे ज्ञान प्राप्त केले जाते.

खगोल विज्ञानाच्या अध्ययनाच्या अध्ययनाचा मानवास फायदा कोणता? किंवा आकाशातील घटनांशी मानवाचा कोणता संबंध आहे?
असे प्रश्न उपस्थित होतात.
याचे उत्तर असे की, पृथ्वीवर घडणाऱ्या घटनांची योग्य माहिती आणि ज्ञान तेव्हाच शक्य आहे.

जेव्हा आकाशातील चंद्र, तारे, नक्षत्र आणि सूर्याचे पृथ्वीशी असलेल्या संबंधाचे ज्ञान असेल.

आकाशातील सूर्य, चंद्र, तारे आणि नक्षत्र यांच्यात होणारे परिवर्तन हे पृथ्वीला प्रभावित करतात.
हे सर्व ज्ञान खगोल विज्ञानाद्वारे प्राप्त होते.
कॉम्टने गणित विज्ञानानंतर खगोल विज्ञानास स्थान दिले कारण हे विज्ञान केवळ गणितावर अवलंबून आहे.
गणिताच्या आधारावरच खगोल विज्ञानात अध्ययन केले जाते.

(३) भौतिक किंवा पदार्थ विज्ञान (Physics) :-

पृथ्वी अर्थात भूमीवरील घटनांचे अध्ययन करणारे भौतिक विज्ञान आणि रसायन विज्ञान हे दोन वेगळे विज्ञान आहेत.
या दोन्ही विज्ञानात अजैविक (Inorganic) घटनांचे अध्ययन केले जाते. भौतिक विज्ञानात भौतिक घटनांचे आणि रसायन विज्ञानात रसायन अध्ययन केले जाते. कॉम्टच्या मते भौतिक विज्ञान हे रसायन विज्ञानापेक्षा अधिक सामान्य आहे आणि रासायनिक घटना या भौतिक विज्ञान

नियमांवर आधारीत आहेत.
परंतु भौतिक विज्ञानाचे नियम रासायनिक घटनांद्वारा प्रभावित होत नाही.
म्हणून भौतिक विज्ञानाचा क्रम हा रसायन विज्ञानाच्या आधी येतो.
भौतिक विज्ञानावर गणित आणि खगोल या दोन्ही विज्ञानाचा प्रभाव पडतो.
कारण विविध प्रकारचे ग्रह आणि उपग्रहांचा सर्व भौतिक वस्तुंवर एक विशिष्ट आणि निश्चित प्रभाव पडत असतो.
अशा प्रकारचे अजैविक घटनांचे अध्ययन खगोल, भौतिक आणि रसायन या तिन्ही विज्ञानाद्वारे केले जाते.

(४) रसायन विज्ञान (Chemistry) :- रसायन विज्ञानात पदार्थांची रासायनिक रचना, रासायनिक प्रक्रिया आणि रासायनिक स्वरूपांचे अध्ययन केले जाते.
रासायनिक प्रक्रियांवर भौतिक प्रक्रिया आणि गणिताचा प्रभाव पडतो.
परंतु रसायन विज्ञानाचा प्रभाव भौतिक विज्ञान आणि गणितावर पडत नाही.
रासायनिक प्रक्रिया उष्णता, विद्युत इत्यादी द्वारे संचालीत आणि प्रभावित होतात.
म्हणून रसायन विज्ञानाचा क्रम भौतिक येतो.

Page No.:
Date:
YOUVA

(5) जीव विज्ञान (Biology) :- कॉम्तने जैविक घटनांचे व्यक्तिगत आणि सामूहिक अशा दोन भागांमध्ये विभाजन केले आहे.

व्यक्तिगत जैविक घटनांच्या अंतर्गत, मानव, पशू आणि वनस्पतींशी संबंधित संपूर्ण शारीरिक रचना आणि क्रियांचा समावेश होतो.

ज्यांचे अध्ययन जीव विज्ञानात केले जाते. जीव विज्ञान हे गणित, खगोल, भौतिक आणि रसायन या सर्व विज्ञानांवर अवलंबून आहे.

जीव विज्ञानात यथार्थता, निश्चितता आणि विश्वसनीयता आढळून येते, जी गणित विज्ञानातील नियमांवर आधारित आहे.

ग्रह, नक्षत्रे इत्यादींची स्थिती आणि गती मुळे प्राण्यांची संरचना आणि क्रिया प्रभावित आणि परिचलित होतात.

म्हणून जीव विज्ञान हे खगोल विज्ञानावर अवलंबून आहे.

कारण खगोल विज्ञान हे सांगते की, जर पृथ्वीची गती ही तिच्या वर्तमान गतीपेक्षा वाढली तर शारीरिक प्रक्रियांमध्ये तीव्रता निर्माण होते.

ज्याचा परिणाम प्राण्यांचे आयुष्यमान

क्रमी होण्यावर होते
जीव विज्ञान भौतिक विज्ञानावर देखील अवलंबून आहे.
कारण जीव विज्ञान हे भौतिक विज्ञानाकडून जिवंत प्राण्याच्या भार आणि तापमान इत्यादींचे ज्ञान प्राप्त करते.
जीव विज्ञान रसायन विज्ञानाच्या देखील ऋणी आहे.
कारण जीव विज्ञान हे रसायन विज्ञानाकडून पोषण आणि शरीरातून रस काढण्याच्या सूक्ष्मतेत ज्ञान प्राप्त करते.
कॉम्टच्या मते, इतर विज्ञानाच्या तुलनेत जीव विज्ञान हे सर्वांत क्रमी निश्चित अवस्थेपर्यंत पोहचू शकले.
म्हणून जीव विज्ञान हे भौतिक, रसायन आणि इतर सर्व विज्ञानांवर अवलंबून आहे.
कॉम्टने मानसविज्ञानास (Psychology) शरीर विज्ञान (Psychology) आणि जीव विज्ञानाचे एक अंग मानले आहे.

(६) समाज विज्ञान किंवा समाजशास्त्र (Sociology) :- कॉम्टच्या मते, सामूहिक जैविक किंवा सावयवी घटनांचे अध्ययन करणारे विज्ञान म्हणजे समाज विज्ञान किंवा समाजशास्त्र (Sociology) होय.

समाज विज्ञान हे अन्य विज्ञानाच्या तुलनेत सर्वाधिक विशिष्ट आणि जटिल असून ते सर्वच विज्ञानावर अवलंबून आहे.

कॉम्टच्या मते, सामाजिक जीवनाशी संबंधित सर्व घटनांचे अध्ययन एकाच विज्ञानाच्या अंतर्गत करणे उपयुक्त होईल.

ज्यास त्याने समाज विज्ञान म्हटले आहे. समाज विज्ञान हे आपल्या पूर्वीच्या सर्व विज्ञानावर अवलंबून आहे. म्हणून या विज्ञानात सर्वात कमी निश्चितता आढळून येते.

परंतु ज्या प्रकारे इतर विज्ञान अनिश्चितते-कडून निश्चितेकडे गेलत, त्याचप्रकारे समाजशास्त्र देखील मानवी चिंतनाच्या तीन स्तरातून जाऊन निश्चितेच्या उद्दिष्टाकडे अग्रेसर आहे.

अशाप्रकारे कॉम्तने विज्ञानांचे सोपान स्पष्ट केले आहे.
कॉम्तच्या मतानुसार समाजशास्त्र हे एक नवीन आणि विशिष्ट विज्ञान आहे.
म्हणून ते आपल्या पूर्वीच्या सर्व विज्ञानावर अवलंबून आहे.
ते जटिल आहे. विज्ञानाच्या सोपानावरून विज्ञानाचा क्रम आणि त्यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे शोधण्यात सांगता येईल.

1) गणित विज्ञान :⇒ स्वतंत्र, संपूर्ण आणि सर्वाधिक प्राचीन विज्ञान.

2) खगोल विज्ञान :⇒ गणित विज्ञानावर अवलंबून.

3) भौतिक विज्ञान :⇒ गणित आणि खगोल विज्ञानावर अवलंबून.

4) रसायन विज्ञान :⇒ गणित खगोल आणि भौतिक विज्ञानावर अवलंबून.

5) जीव विज्ञान :⇒ गणित, खगोल, भौतिक आणि रसायन विज्ञानावर अवलंबून.

6) समाज विज्ञान (समाजशास्त्र) :⇒ गणित, खगोल,

भौतिक, रसायन, आणि जीव विज्ञानावर
अवलंबून. नवीन विशिष्ट आणि जटिल
विज्ञान.

कॉम्त म्हणतो की, सर्व प्रकारच्या
विज्ञानाचे अध्ययन हे त्याच क्रमामध्ये
केले पाहिजे. ज्या क्रमाने ते विज्ञानाच्या
सोपानक्रमामध्ये आले आहे.

उदा. तर समाजशास्त्राचे अध्ययन
करायचे असेल तर गणित, खगोल, भौतिक
रसायन आणि जीव विज्ञानासंबंधी नियमांची
माहिती करून घेतली पाहिजे.

जीव विज्ञान संपूर्ण जीवाचे स्वरूप, जीवांचा
उद्भव आणि विकास, त्यांचे जीवन इत्यादी
च्या संदर्भात माहिती देते.

म्हणून मानवाच्या सामाजिक जीवनाबाबत
अध्ययन करण्यापूर्वी जीव विज्ञानाचे
अध्ययन आवश्यक आहे.

कॉम्तचा प्रस्तुत विज्ञानांच्या सोपानाचा उद्देश
समाजशास्त्रीय अध्ययनाविषयी वैज्ञानिक
दृष्टिकोनाचा विकास करून समाजशास्त्रास
एक सुदृढ आधार प्रदान करणे हा
आहे.

विज्ञानांच्या सोपानामध्ये कॉम्तने
समाजशास्त्रास सर्वात वर ठेवले
कारण हे एक नवीन, विशिष्ट
आणि जटिल विज्ञान आहे.

Page No.
Date

Name :- Bhagyashri Murlidhar Ninawe

sub :- Sociology

clg :- Yashoda girls arts and commerce college

I year B.A. II semestar

2021 - 2022

Bhagyashri Ninawe

Prakash sonak sir

Principal
Yashoda Girls Arts & Commerce
College, Sneh Nagar, Nagpur-15

SEAL

Page No.
Date

## लिंगाची संकल्पना

पुरुषत्व आणि स्त्रीत्व यांच्यात भेद करणे आणि त्याच्याशी संबंधित वैशिष्ट्यांची श्रेणी म्हणजे लिंग होय. या वैशिष्ट्यांमध्ये जैविक लिंग, लिंगावर आधारित सामाजिक संरचना किंवा लिंग ओळख यांचा देखील समावेश होतो बहुतांश संस्कृतीमध्ये लिंग द्विआधारी चा उपयोग केला जातो. ज्यामध्ये दोन लिंग असतात. उदा. मुले- पुरुष आणि मुली- महिला. जे लोक पुरुष आणि स्त्री या दोन लिंगापेक्षा वेगळे असतात; त्यांच्यासाठी गैरद्विआधारी किंवा लिंगापेक्षा वेगळा हे शब्द वापरतात. काही समाजात पुरुष आणि स्त्री लिंगापेक्षा विशिष्ट लिंग आहे. उदा. दक्षिण आशियामध्ये हिजडा. भारतात पुरुष आणि स्त्री नसलेल्या लिंगाच्या व्यक्तीस तृतीय लिंग किंवा 'हिजडा' असे संबोधतात.

सेक्स विशेषज्ञ जॉन मनी यांनी 1955 मध्ये भूमिकेच्या रूपात जैविक लिंग (Biological sex) आणि लिंग (Gender) यांच्यामधील पारिभाषिक भेद स्पष्ट केला होता. त्यांच्या या अध्ययनापूर्वी 'लिंग' या शब्दाचा उपयोग व्याकरणात्मक श्रेणीशिवाय कोणत्याही गोष्टींचा संदर्भ घेण्यासाठी लिंग हा शब्द वापरणे एक सामान्य बाब नव्हती. असे असले तरी जॉन मनीच्या या शब्दाचा अर्थ 1970 पर्यंत व्यापक झाला नव्हता. जेव्हा स्त्रीवादी सिध्दांतानी जैविक लिंग आणि लिंगाचे सामाजिक रचना यांच्यामधील भेदाची संकल्पना स्वीकारली. तेव्हा 'लिंग' या शब्दाचा उपयोग केला जाऊ लागला. आज काही संदर्भात, विशेषतः सामाजिक विज्ञान आणि विश्व आरोग्य संघटनाच्या लिखित दस्तावेजात ~~वैदिक~~ जैविक लिंग आणि लिंग यांच्यातील भेदाचा उल्लेख करण्यात आला. अन्य संदर्भात सामाजिक विज्ञानाच्या काही क्षेत्रात लिंग मध्ये सेक्स ~~या~~ च्या समावेश होतो किंवा त्यास प्रतिस्थापित केले जाते उदा. गैर मानव पशू संशोधनात सामान्यपणे पशुंच्या जैविक लिंगाच्या संदर्भात उपयोग केला जातो.

Page No.
Date

लिंगाच्या अर्थातील या बदलाचा शोध 1980 च्या दशकात लावण्यात आला. 1993 मध्ये युएसए फुड अँड ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन ने 'सेक्स' ऐवजी लिंग चा उपयोग करणे सुरु केले. त्यानंतर 2011 मध्ये युएसए फुड अँड ड्रग ॲडमिनिस्ट्रेशनने आपला दृष्टीकोन बदलविला आणि 'सेक्स' ला जैविक वर्गीकरण मानले. तर लिंगाची अशी परिभाषा केली की, "एका व्यक्तीचे स्वतःचे प्रतिनिधित्व किंवा त्या व्यक्तीस सामाजिक संस्थाद्वारा त्याच्या लिंग प्रस्तुतीच्या आधारावर कसा प्रतिसाद दिला जातो.

सामाजिक विज्ञानात लिंगाच्या अध्ययनासाठी समर्पित एक शाखा आहे. सेक्सोलॉजी आणि मज्जातंतू विज्ञान हे विज्ञान देखील या विषयात रुची ठेवतात. सामाजिक विज्ञान कधी कधी एका सामाजिक रचनेच्या रूपात आपला दृष्टीकोन ठेवते. विशेष म्हणजे लिंगाच्या अध्ययनात असा दृष्टीकोन असतो. स्त्री आणि पुरुष यांच्यातील जैविक फरकाचा प्रभाव मानवात लिंगाच्या विकासावर परिणाम करतात की नाही याचा अभ्यास नैसर्गिक विज्ञानात केला जातो. वरील दोन्ही विज्ञानांनी या गोष्टीवरील वादविवादास सूचित केले की, जैविक फरक लिंग ओळखीस किती प्रभावित करतो. काही इंग्रजी साहित्यात सुध्दा जैविक लिंग, मानसवैज्ञानिक लिंग आणि सामाजिक लिंग भूमिकांच्या मध्ये त्रिवर्गभेद आहे. लिंगाच्या संदर्भातील मांडणी प्रथम 'ट्रान्ससेक्सूअलीझम' या विषयावरील स्त्रीवादी पेपरात 1978 मध्ये करण्यात आली.

यावरून हे स्पष्ट होते की, आधुनिक अर्थाने लिंगाची संकल्पना ही मानवी इतिहासात नवीन शोध आहे. प्राचीन जगात लिंगास समजून घेण्याचा कोणताच आधार नव्हता कारण काही दशकांपासून मानववंशशास्त्र आणि सामाजिक विज्ञानात लिंगाची संकल्पना अस्तित्वात आली. 1970 च्या दशकात स्त्रीवादी विद्वानांनी जैविकदृष्ट्या निर्धारित पैलू 'सेक्स' पासून पुरुष-महिला असा फरक केला.

Page No.
Date

लिंगाच्या सामाजिकदृष्ट्या निर्मित पैलूंचा फरक म्हणून लिंग ही संकल्पना स्वीकारली. २०व्या शतकात शेवटच्या दोन दशकापासून शैक्षणिक क्षेत्रात लिंग, या शब्दाच्या प्रसाराकरिता स्त्रीवादाचा प्रभाव महत्वाचा आहे.

लिंगाच्या व्याख्या

1) ऑक्सफोर्ड शब्दकोष :-

" एकतर पुरुष आणि स्त्री या दोन लिंगापैकी एक; विशेषत: जेव्हा जैविकतेपेक्षा सामाजिक आणि सांस्कृतिक फरकाच्या संदर्भात पुरुष आणि महिलांच्या प्रस्थापित कल्पनांशी संबंधित नसलेल्या ओळखींच्या श्रेणी दर्शविण्यासाठी या संज्ञेचा उपयोग अधिक व्यापकपणे केला जातो."

2) अन्न आणि शेती संघटन, युनो

" लिंगाचे निर्धारण महिला किंवा पुरुष यौन वैशिष्ट्यांच्या परिणाम स्वरूप केले जात नाही. तर ते सामाजिकरित्या निश्चित केले जाते. हे समाजाच्या केंद्रीय आयोजनाचे तत्व आहे. आणि जे उत्पादन आणि पुनरुत्पादन, उपभोग आणि वितरण प्रक्रियेचे प्रशासन करते."

3) विश्व आरोग्य संघटन

" लिंग हा शब्द स्त्रिया आणि पुरुषाच्या सामाजिक रूपात निर्मित वैशिष्ट्यांचे वर्णन करण्यासाठी उपयोगात आणला जातो. तर सेक्स हा शब्द जैविकतेच्या रूपात निर्धारित केलेल्या लोकांच्या संदर्भात वापरला जातो. लोक स्त्री किंवा पुरुष म्हणून जन्माला येतात. परंतु मुली आणि मुले हे स्त्री आणि पुरुष म्हणून विकसित होतात. हे शिक्षित वर्तन लिंगाची ओळख बनते आणि लिंग भूमिकांचे निर्धारण करते."

Page No.
Date

अर्थ :-

लिंगाच्या वरील व्याख्यांवरून लिंग म्हणजे काय ? हे स्पष्ट होते. पूर्वी 'सेक्स' आणि 'जेंडर' या दोन शब्दात फरक केला जात नव्हता. 1980 पासून लिंग शब्दाचा नवा अर्थ प्रचलित झाला. सेक्स याचा अर्थ देखील लिंग असाच करण्यात आला होता. तसेच जेंडर चा अर्थ देखील 'लिंग' असाच मानला जात होता. परंतु 1980 पासून सेक्स आणि जेंडर हे समानार्थी शब्द नसून त्यामध्ये फरक असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

सेक्स चा अर्थ जैविक लिंग असा केला जातो. म्हणजे जैविक आधारावर ते मूल मुलगा की मुलगी आहे हे ओळखले जाते. यामध्ये व्यक्तीचे जैविक पैलू हे त्याच्या शरीर विज्ञानाद्वारे निर्धारित केले जातात. हे जैविक पैलू त्याच्या गुणसूत्रे हार्मोन्स आणि आंतरक्रियांद्वारे निश्चित होतात. उदा. स्त्री किंवा पुरुष म्हणजेच मुलाच्या जन्मानंतर जैविक पैलूंच्या आधारावर ते मूल मुलगा की मुलगी हे ओळखले जाते. सेक्स हा शब्द लिंग या अर्थाने देखील वापरला जातो. परंतु ते जैविक लिंग होय. विश्व आरोग्य संघटनेच्या व्याख्येत सेक्स हा शब्द जैविकतेच्या संदर्भातच वापरला आहे.

सेक्सपेक्षा लिंग चा अर्थ हा वेगळा आहे. लिंग ही सामाजिक निर्मिती आहे. कारण लिंग हे सामाजिक दृष्टीने तयार केलेल्या वैशिष्ट्यांवर आधारित आहे. जैविकतेच्या आधारावर मूल हे पुलिंगी किंवा स्त्रीलिंगी आहे हे निश्चित केले जाते. परंतु मुली आणि मुलगा स्त्री आणि पुरुष म्हणून कसे वाढविले जाते म्हणजेच त्यांचा विकास कसा होतो हे समाज ठरवित असतो. मुलीने मुलीसारखे वागले पाहिजे तर मुलाने मुलासारखे वागले पाहिजे, या संदर्भातील नियम, चालीरिती समाज निश्चित करतो. मुला- मुलींना त्यांच्या लिंगानुसार वर्तन कसे करावे हे शिकविले जाते. इतकेच नव्हे तर लिंगानुसार

त्यांच्या भूमिका निश्चित केल्या जातात. त्यासाठी लिंगाची संकल्पना वापरली जाते. यांचाच अर्थ विशिष्ट वर्तन लिंगाची ओळख बनते आणि लिंग भूमिकांचे निर्धारण केले जाते. म्हणूनच लिंग ही सामाजिक निर्मिती किंवा रचना मानण्यात आली आहे.

थोडक्यात, लिंग हे सामाजिकदृष्ट्या निर्मित भूमिका आणि वर्तन आहे. ज्यामुळे एक समाज विशिष्ट प्रकारे पुरुष आणि स्त्रियांशी संपन्न असतो. लिंग हे स्त्री आणि पुरुषांच्या सामाजिकदृष्ट्या निर्मित वैशिष्ट्यांशी संबंधित आहे. उदा. प्रमाणके, मूल्ये, भूमिका आणि स्त्री व पुरुषांमधील संबंध या बाबी प्रत्येक समाजानुसार भिन्न असतात आणि त्यात परिवर्तन करता येते.

## सेक्स आणि लिंग यामधील फरक

| सेक्स | लिंग |
|---|---|
| ① पुल्लिंगी आणि स्त्रीलिंगी अशा श्रेणीत विभाजन | ① स्त्रीत्व आणि पुरुषत्व यांत विभाजन |
| ② सेक्स हे जैविक आधारावर निर्धारित होते. | ② तर लिंग हे सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक घटकांच्या आधारावर निर्धारित होते. |
| ③ जन्माच्या वेळी लिंग निर्धारित होते. | ③ तर लिंगाची ओळख, वर्तन इत्यादी सामाजीकरणाच्या प्रक्रियेतून शिकले जाते. |
| ④ व्यक्तीचे लिंग हे कधीच बदलत नाही. | ④ वेळ आणि काळानुसार लिंग बदलाच्या वर्तन आणि भूमिकात बदल होतो. |
| ⑤ सेक्स हे समान रूपात मूल्यवान आहे. | ⑤ लिंग हे समान रूपात मूल्यवान नाही. |

लिंगाच्या विशिष्ट श्रेणी :-

लिंगाच्या आधारावर व्यक्तीचे वेगवेगळ्या श्रेणीत विभाजन केले जाते. साधारणत लिंगाच्या आधारावर समाजातील लोकांचे पुरुष आणि स्त्री या दोन प्रकारात विभाजन करण्यात आले आहे. या दोन मुख्य प्रकाराशिवाय इतर आणखी प्रकार किंवा श्रेणी आहेत. उदा. लेस्बीयन, गे, तृतीयपंथी, उभयलिंगी, ट्रान्सजेंडर, क्वीर इत्यादी. लेस्बीयन, उभयलिंगी, ट्रान्सजेंडर इत्यादी लोकांचा उल्लेख एलजीबीटीक्यू या संज्ञेद्वारे केला जातो. म्हणून लिंगाचे पुरुष, स्त्री आणि एलजीबीटीक्यू हे तीन प्रकार सांगता येईल.

1) पुरुष :-

स्त्री आणि पुरुष यांच्यात जैविक आधारावर काही भेद आहेत हे खरे आहेत. परंतु स्त्री आणि पुरुष हे दोघेही समान असून त्यांना समान अधिकार आहेत. स्त्री आणि पुरुष यांच्यातील जैविक भेदाव्यतिरिक्त अनेक भेद आहेत. विशेष म्हणजे जैविक भेदाशिवाय इतर सर्व भेद हे सामाजिक आणि सांस्कृतिक आहेत. हे भेद समाजनिर्मित आहेत ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे.

मानवी समाजात स्त्रीपेक्षा पुरुषांना विशेष महत्व देण्यात आले आहे. पुरुष हा स्त्रीपेक्षा श्रेष्ठ आहे. तर स्त्री ही गौण आहे अशी सामाजिक मान्यता होती. त्यामुळे पुरुषांना अनेक विशेषाधिकार देण्यात आलेत तर महिलांना विशेषाधिकार तर दिले नाहीत. उलट त्यांना साधे मानवी अधिकार देखील नाकारण्यात आले होते. लहानपणापासून मुला-मुलींच्या मनात सामाजीकरणाद्वारे असे बिंबविले जाते की, मुले हे मुलींपेक्षा श्रेष्ठ असतात. संपूर्ण जगात सर्वत्र पुरुषास श्रेष्ठ दर्जा देण्यात आला आहे. समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रात पुरुषांना अधिक महत्व दिले आहे. सर्व पुरुषप्रधान संस्कृती आहे. पुरुषांना महिलापेक्षा बलवान आणि कर्तबगार

Page No.
Date

मानण्यात आले. त्यामुळे प्रत्येक गोष्टीमध्ये पुरुषांनाच प्राधान्य दिले आहे.

प्राचीन काळापासून मानवी समाजात पुरुषांचे वर्चस्व राहिले आहे. कुटुंबाचा प्रमुख हा पुरुष असतो. संपूर्ण कुटुंबावर त्याचे वर्चस्व आणि नियंत्रण असते. सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक आणि इतर सर्वच क्षेत्रात पुरुषांचे वर्चस्व होते आणि आज देखील आहे. म्हणून सर्वच देशातील समाज पुरुषप्रधान आहेत. काही आदिवासी समाजात मातृसत्ताक कुटुंबपध्दती आढळते. मातृसत्ताक पध्दतीमध्ये महिलांची सत्ता असते. परंतु मातृसत्ताक पध्दती सर्वत्र आढळत नाही. विशेष म्हणजे मातृसत्ताक आदिवासी समाजाचा अपवाद वगळला तर सर्वच समाजात पितृसत्ता आहे. विवाहानंतर पत्नी पतीच्या घरी रहायला जाते. विवाहानंतर पत्नीची ओळख पतीच्या नावाने होत असते. समाजात देखील पुरुषांचेच वर्चस्व असते. राजकारणात देखील पुरुषच असतात. यावरून हे स्पष्ट होते की, कुटुंब आणि समाजात पुरुषांनाच विशेष महत्व आहे.

सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या पुरुषांची काही लक्षणे निश्चित करण्यात आली आहेत. प्रबळ, मजबूत, स्वतंत्र, खंबीर, शूर आणि नाविन्यपूर्ण ही पुरुषांची लक्षणे आहेत. एखादा मुलाचे मित्रांसोबत भांडण झाले असेल आणि तो रडत घरी आला असेल तर त्याला आई-वडील सांगतात की, 'मित्रांचा मार कशाला खाल्ला, त्याला देखील झोडपायचे असते.' जर मुलगा रडत असेल तर त्याला आई-वडील उपदेश करतात की, 'मुलीसारखे रडत बसू नको.' म्हणजे मुली रडक्या असतात आणि मुलांनी रडायचे नसते. लहानपणापासूनच मुलांच्या मनावर बिंबवले जाते की, तू मुलगी नाही, मुलगा आहेस! मुलांचे संगोपन करताना त्याच्यावर पुरुषांचे लक्षणे कसे निर्माण होतील, याची काळजी पालक घेतात. त्यामुळे मुलांना जाणीव होते की, मी मुलगा आहे ही जाणीव पुढे त्याच्या व्यक्तिमत्वाचा अविभाज्य भाग बनतो. पुरुषांमध्ये पुरुष असल्याचा गर्व असतो. तो पुरुष म्हणून आपले अधिकार गाजवितो.

समाजातील प्रमाणके, मूल्ये, प्रथा, परंपरा इत्यादी अनेक गोष्टी पुरुषप्रधान असतात. पुरुष हा वेगळा आहे. तो शूर आणि लढवय्या आणि कर्तबगार असतो असे मानले जाते. पुरुषांची ही लक्षणे नैसर्गिक नसून समाजनिर्मित आहेत. त्यानुसार मुलांची जडण-घडण केली जाते. त्यांच्यामध्ये पुरुषाची लक्षणे निर्माण केली जातात.

आधुनिक काळात सर्वच देशांनी लिंग समतेचा पुरस्कार केला आहे. लिंग समतेच्या संदर्भात अनेक कायदे करण्यात आलेत; असे असले तरी अजूनही पूर्णपणे लिंग समता प्रस्थापित झाली नाही. आजही सर्वत्र पुरुषांचे वर्चस्व आणि नियंत्रण आहे. त्यांच्यात पुरुष असल्याचा अहंकार आहे. समाजात आपले वर्चस्व कायम राहावे म्हणून पुरुष सतत प्रयत्न करीत असतो. परंतु आधुनिक काळात काही पुरुषांच्या विचारात परिवर्तन झाले असून ते लिंग समतेचा पुरस्कार करतात.

2) महिला :-

लिंगाचा दुसरा प्रकार म्हणजे महिला होय. महिला ही मुलांना जन्म देऊन समाजाचे सातत्य टिकवून ठेवते. पुरुषांची देखील ती माता आहे. तिचे प्रजोत्पादनाचे कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. वैज्ञानिक अध्ययनातून हे स्पष्ट झाले की, महिला देखील पुरुषांप्रमाणेच सर्वच क्षेत्रात प्रगती करू शकते. ती पुरुषांपेक्षा ~~जास्त~~ कोणत्याच बाबतीत कमजोर नाही. असे असले तरी पुरुषप्रधान समाजाने तिला गौण असतात, त्या पुरुषांची बरोबरी करू शकत नाही. असे सातत्याने सामाजीकरणाच्या प्रक्रियेद्वारे तिच्या मनावर बिंबविले आले आहे. एखादी मुलगी मुलांसारखी वागत असेल तर तिचे आई-वडील तिला जाणीव करून देतात की, 'तू मुलगी ~~मुलांसारखी~~ आहेस, मुलगा नाही. त्यामुळे तू मुलींसारखीच वागली पाहिजे.' समाजातील प्रमाणके, मूल्ये, प्रथा आणि परंपरा याद्वारे मुलींचे पुरुषांपेक्षा गौण अशाप्रकारचे व्यक्तिमत्व निर्माण केले जाते. महिलांच्या भूमिका या पुरुषांपेक्षा वेगळ्या आहेत.

Page No.
Date

महिलांनी प्रजोत्पादन करावे आणि स्वयंपाक करून सर्वांना जेवण घावे. त्यांचे कार्यक्षेत्र हे चार भिंतीच्या आत असते. अशाप्रकारची जाणीव लहानपणापासूनच तिच्यामध्ये निर्माण केली जाते.

सामाजिकदृष्ट्या महिलांची लक्षणे ही पुरुषांपेक्षा वेगळी मानली जातात. भावनाप्रधान, सहयोगात्मक, पालनपोषण, असुरक्षित, सर्वांची काळजी घेणे आणि नम्रता ही महिलांची लक्षणे समाजाने निश्चित केली आहेत. विशेष म्हणजे ही लक्षणे जैविक नाहीत. ती सामाजिक आणि सांस्कृतिक आहेत. प्राचीन काळापासूनच पुरुषांनी महिलांना आपल्या नियंत्रणात ठेवले आहे. महिलांनी पुरुषाप्रमाणे वागणे वाईट मानले जाते.

महिलांना पुरुषांपेक्षा गौण मानून तिचा एक व्यक्ती म्हणून विकास होऊ दिला नाही. तिला मानवी अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले. स्त्री ही पुरुषांची दासी असते. तिने पुरुषांची बरोबरी करू नये असे तिला वारंवार सांगितले जाते. महिला देखील पुरुषांप्रमाणे कर्तबगार आहेत. हे खरे असले तरी तिच्या व्यक्तिमत्वाची जडण- घडण ही समाजातील पुरुषप्रधान प्रमाणके, मूल्ये, प्रथा आणि परंपरेद्वारे केली जाते. तिच्या व्यक्तिमत्वाचा एक व्यक्ती किंवा माणूस म्हणून विकास होऊ दिला जात नाही. समाजातील प्रमाणके, मूल्ये, प्रथा आणि परंपरा या सर्व पुरुषप्रधान संस्कृतीने पुरुषांच्या हिताच्या दृष्टीने निर्माण करण्यात आल्यात त्यामुळे महिलांचा एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून विकास होऊ शकला नाही.

महिलांच्या संदर्भात सतत भेदभाव केला जातो. हा भेदभाव तिच्या जन्मापासूनच केला जातो. अलीकडे बाळाच्या जन्म होण्यापूर्वी गर्भचाचणी केली जाते. जर मातेच्या पोटात वाढणारे बाळ हे मुलगी असेल तर भ्रूणहत्या केली जाते. कुटुंबात मुलीचे संगोपन करताना देखील भेदभाव केला जातो. मुलीच्या जन्माचे स्वागत केले जात नाही. कुटुंबात मुलापेक्षा मुलीला गौण मानून तिच्यासोबत भेदभावपूर्ण व्यवहार केला जातो. म्हणजेच जन्मापासूनच मुलीला कुटुंबात मुलापेक्षा गौण

वागणूक दिली जाते. त्याचा परिणाम तिच्या मानसिकतेवर पडतो. आज ही स्त्री असून देखील ती मुलाचे भेदभावपूर्ण संगोपन करते.

अलीकडे लिंग समतेचा पुरस्कार करण्यात आला. स्त्री- पुरुष यांच्यातील जैविक भेद असले तरी ती देखील एक व्यक्ती आहे म्हणून तिच्याशी भेदभावपूर्ण व्यवहार करू नये. पुरुषप्रमाणेच तिला सर्व अधिकार दिले पाहिजे. भेदभावपूर्ण व्यवहार न करता तिला प्रतिष्ठा द्यावी. हे विचार सर्वच देशात महत्वाचे मानले जातात. त्यामुळे जगात लिंग समता प्रस्थापित केली जात आहे. असे असले तरी आजही महिलांना गौण मानून तिला भेदभावपूर्ण वागणूक दिली जाते.

3) एलजीबीटीक्यू :-

लिंगाची एलजीबीटीक्यू ही एक श्रेणी आहे. इंग्रजी भाषेत 'Lesbian' 'Gay' 'Bisexual' 'Transgender' आणि 'Queer or Questioning' या पाच शब्दांचे पहिले अक्षर मिळून 'LGBTQ' हे संक्षिप्त शब्द तयार करण्यात आला. या संज्ञाचा उपयोग एखादा व्यक्तीचे लैंगिक प्रवृत्ती किंवा लिंग ओळखीचे वर्णन करण्यासाठी केला जातो. 'एलजीबीटीक्यू' या संज्ञेचा अर्थ लक्षात घेण्यासाठी या संज्ञेअंतर्गत ज्या पाच संज्ञाचा समावेश करण्यात आला, त्या संज्ञाचा अर्थ स्पष्ट करणे आवश्यक आहे.

1) लेस्बीयन :-

'लेस्बीयन' म्हणजे समलिंगी स्त्री होय. अशा स्त्रीचे शारीरिक, प्रेमाणे आणि भावनिक आकर्षण हे इतर स्त्रियांबद्दल असते. काही लेस्बीयन स्वत:ची समलैंगिक किंवा समलिंगी महिला म्हणून ओळख करणे पसंत करतात.

2) गे :-

'गे' हा शब्द समलिंगी पुरुष किंवा समलिंगी असण्याची लक्षणे असणाऱ्या पुरुषांच्या संदर्भात वापरला जातो. 'गे' हा शब्द वारंवार समलिं पुरुषाचे वर्णन करण्यासाठी उपयोगात आणला जातो. परंतु लेस्बीयन महिलांना सुध्दा 'गे' या शब्दाने संबोधले जाते. कारण लेस्बीयन म्हणजेच महिला या देखील समलिंगी आहेत.

3) उभयलिंगी :-

उभयलिंगी म्हणजे अशी व्यक्ती की, ज्याची समान लैंगिक किंवा इतर लिंगाच्या व्यक्तीकडे शारीरिक, प्रेमाचे किंवा भावनिक आकर्षण तयार करण्याची क्षमता आहे. लोक हे आकर्षण आपल्या आयुष्यभर विविध मार्गाने आणि मात्रांमध्ये अनुभवू शकतात. उभयलिंगी व्यक्तींना उभयलिंगी होण्यासाठी विशिष्ट लैंगिक अनुभव घेण्याची गरज नाही. विशेष म्हणजे उभयलिंगी म्हणून ओळखण्यासाठी कोणत्याही लैंगिक अनुभवाची आवश्यकता नसते.

4) ट्रान्सजेंडर :-

ट्रान्सजेंडर ही एक छत्री संज्ञा आहे. ही संज्ञा ज्यांची लिंग ओळख किंवा लिंग अभिव्यक्ती ही त्यांच्या जन्माच्या वेळी निश्चित केलेल्या लिंगापेक्षा वेगळी असते. ट्रान्सजेंडर या छत्री संज्ञेअंतर्गत असणारे लोक स्वतःचे वर्णन ट्रान्सजेंडरसह एक किंवा अनेक प्रकारच्या शब्दाचा वापर करून करतात. अनेक ट्रान्सजेंडर लोकांना त्यांच्या लैंगिक ओळखीसह त्यांचे शरीर संरेखित करण्यासाठी डॉक्टरांनी हार्मोन्स दिले असतात. काहीवर शस्त्रक्रिया देखील होतात. परंतु सर्वच ट्रान्सजेंडर लोक अशी पावले ~~चालू~~ उचलू शकतात किंवा उचलू शकणार नाहीत. ट्रान्सजेंडर्सची ओळख शारीरिक बाह्य रूपावर किंवा वैद्यकीय प्रक्रियेवर अवलंबून नसते.

Page No.
Date

5) क्वीर :-

काही लोकांद्वारा विशेषत: युवक लोकांद्वारा उपयोगात आणले जाणारे क्वीर की हे विशेषण आहे. क्वीर म्हणजे ज्यांची लैंगिक अभिव्य ही केवळ विषमलैंगिक नसते विशेष म्हणजे जे लोक क्वीरच्या रूपात स्व ओळख करतात, त्यांच्याकरिता लेस्बीयन, समलिंगी आणि उभयलिंगी या संज्ञा मर्यादित वाटतात. आणि सांस्कृतिक अर्थाने परिपूर्ण असल्याचे मान नाही. काही लोक त्यांच्या लिंग ओळख आणि लिंग अभिव्यक्तीचे वर्ण करण्यासाठी क्वीर किंवा सामान्यपणे जेंडरक्वीर हे शब्द वापरू शकतात. एकदा निंदासूचक शब्द मानल्यानंतर काही एलजीबीटी लोकांनी स्वत:चे वर्णन करण्यासाठी क्वीर असल्याचा पुन्हा दावा केला. असे असले त 'एलजीबीटी' समुदायाच्या आत सार्वत्रिक रूपात हा स्वीकृत शब्द नाही.

6) प्रश्न विचारणे :-

कधी कधी एलजीबीटीच्या शेवटी क्यू दिसतो. त्याचा अर्थ प्रश्न विचारणे असा आहे. ही संज्ञा कोणत्या अशा व्यक्तीचे वर्णन कर जो आपल्या लैंगिक प्रवृत्तीबद्दल किंवा लिंग ओळखीबाबत प्रश्न उपस्थि करतो.

अशाप्रकारे लेस्बीयन, गे, उभयलिंगी, ट्रान्सजेंडर, क्वीर इत्यादी संज्ञ अर्थ आहे. यावरून या संज्ञा अंतर्गत येणाऱ्या लोकांनी माहिती प्राप्त होऊन त्यांची ओळख होते.

सर्वसामान्य लोकांना एलजीबीटीक्यू लोकांचा तिरस्का वाटतो. ते काही तरी वाईट करतात असा त्यांचा समज आहे. त्यांच्या विषयी लोकांच्या मनात सहानुभूती नाही. सर्वसामान्य लोक लेस्बीयन, उभयलिंगी, ट्रान्सजेंडर इत्यादी लोकांना वाईट मानून त्यांना विरोध करतात. त्यांना अजून पुरेशी सामाजिक मान्यता मिळाली नाही. पाश्चात देशात लेस्बीयन, गे, उभयलिंगी, ट्रान्सजेंडर लोकांनी आपल्या हक्का

संघर्ष केला. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने 2013 मध्ये त्यांचा विवाह करावयाच्या अधिकार मान्य केला. त्यामुळे लेस्बीयन, गे लोकांना समलिंगी व्यक्तींशी विवाह करण्याचा कायदेशीर हक्क मिळाला. आपल्या देशात मात्र समलिंगी लोकांना विवाह करण्याचा अधिकार मिळाला नाही. असा विवाह हा अनैसर्गिक मानला जातो. एलजीबीटीक्यू लोक हे सर्वच देशात अल्पसंख्यांक आहेत. या लोकांबद्दल इतर लोकांची चांगली भावना नाही. त्यामुळे त्यांच्याशी भेदभाव केला जातो. म्हणून एलजीबीटीक्यू लोकांच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

एलजीबीटीक्यू यांच्या समस्या :-

1) सीमांतीकरण आणि सामाजिक बहिष्कार.
2) एलजीबीटी मुलांवर कुटुंबाच्या प्रतिक्रियेचा प्रभाव : संघर्ष आणि नकार.
3) बेघराची समस्या.
4) समलिंगी लोकांविषयी भय.
5) एलजीबीटी विद्यार्थ्यांचा शाळेत छळ.
6) मानसिक त्रास
7) वाईट आर्थिक परिस्थिती
8) कामाच्या ठिकाणी भेदभाव
9) आरोग्य सेवेत अवरोध
10) वयस्क एलजीबीटी लोकांसमोरील आव्हाने.
11) तिरस्कार गुन्ह्यांचे पीडित.
12) गुन्हे करण्याची समस्या.
13) कायदेशीर अन्याय.

| Page No. | | | |
|---|---|---|---|
| Date | | | |

एलजीबीटीक्यू यांच्या चळवळी :-

युरोपन अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात समलिंगी लैंगिक वर्तन आणि क्रॉस ड्रेसिंग यांस मोठ्या प्रमाणात लोकांचा विरोध होता. क्रॉस ड्रेसिंग म्हणजे आपल्या लिंगानुसार कपडे घालता विरुद्ध लिंगाचे कपडे घालणे. क्रॉस ड्रेसिंग मोठ्या प्रमाणात सामाजिकदृष्ट्या अस्वीकारणीय मानले जात होते. तसेच युदर्लैयून आणि इतर कायद्याच्या अंतर्गत गंभीर अपराध होता. एलजीबीटी लोकांविषयी भेदभाव पाळला जातो. त्यांना समाजमान्यता आणि प्रतिष्ठा मिळावी म्हणून एलजीबीटी लोकांनी सामाजिक चळवळ सुरू केली. ही चळवळ समाजात एलजीबीटी लोकांची वकालत करते. या चळवळी समान अधिकारावर आपले लक्ष केंद्रीत करतात. 1950 मध्ये या चळवळीने स्व-मदत आणि स्व-स्वीकृती यावर लक्ष केंद्रीत केले होते. 1960 आणि 1970 च्या दशकात समलिंगी मुक्ती चळवळ चालविण्यात आली होती. त्यामध्ये स्वातंत्र्यावर भर दिला होता. 2000 मध्ये समलिंगी लोकांना विवाह करण्याचा अधिकार मिळावा म्हणून चळवळ करण्यात आली होती. सर्व एलजीबीटी लोकांचे आणि त्यांच्या हितांचे प्रतिनिधीत्व करणारे व्यापक असे केंद्रीय संघटन नाही. जगात अनेक एलजीबीटी संघटन सक्रिय आहेत. एलजीबीटी लोकांच्या अधिकारांचे समर्थन करण्यासाठी विसाव्या ~~शतकात~~ शतकाच्या सुरुवातीला संघटना निर्माण करण्यात आल्या होत्या.

आज देखील एलजीबीटी लोकांच्या हक्कासाठी संघर्ष सुरू आहे. अलीकडे एलजीबीटी चळवळीस राजकीय सक्रियता आणि सामाजिक क्रियाकलापांच्या विस्तृत श्रृंखलेत संघटित केले आहे. त्यामध्ये दबाव टाकणे, स्ट्रीट मार्चेस, सामाजिक समूह, जनसंवाद माध्यमे, कला आणि संशोधन यांचा समावेश होतो.

लिंग अधिकारांमधील मुद्दे :-

रोका मुलास शिक्षित करणे ही एक गुंतवणूक

| Page No. | | | |
|---|---|---|---|
| Date | | | |

मानली जाते. कारण मुलगा शिकून मोठा झाल्यानंतर तो आपल्या वयोवृध्द आई-वडिलांना पोसेल अशी अपेक्षा केली जाते. तर एका मुलीस शिक्षित केल्यास हुंड्याचा खर्च अधिक होईल. कारण तिला शिक्षित साथीदाराची आवश्यकता असते. मुलीला शिक्षण देणे म्हणजे पैशांचे अपव्यय असल्याचे देखील मानले जाते. कारण मुलीचे लग्न झाल्यानंतर ती आपल्या सासरी जाईल. जर एखादा कुटुंबास आपल्या सर्व मुलांना शिक्षण देणे परवडत नसेल तर मुलांच्या शिक्षणास अधिक प्राधान्य दिले जाते. यावरून हे स्पष्ट होते की, आजही समाजात लिंग विषमता मानली जाते. मुलीपेक्षा मुलाला महत्व देऊन त्याचे संगोपन मुलीपेक्षा अधिक चांगल्या पद्धतीने केले जाते.

भारतासारख्या विशिष्ट विकसनशील राष्ट्रांमध्ये लिंग विषमता लवकर प्रकट होण्यास सुरवात होते. एका मुलीस गर्भात असल्यापासूनच भेदभावना सामना करावा लागतो. आणि तिचे जीवन भ्रूणहत्ये मध्ये समाप्त होते. मुलांपेक्षा मुलीस गौण मानले जाते. विशेष म्हणजे मुलीपेक्षा मुलगा महत्वाचा असतो. तो मुलांपेक्षा मुली गौण मानले जाते. विशेष म्हणजे मुलीपेक्षा मुलगा महत्वाचा असतो. तो मुलीपेक्षा श्रेष्ठ असतो. ~~अशाप्रकार~~ अशाप्रकारची भावना लहानपणापासूनच त्यांच्या मनात बिंबविली जाते. अशाप्रकारची लहानपणापासूनच मुला मुलींच्या संदर्भातील विषमता ही भारतात आणि कमी विकसित देशांमध्ये अधिक प्रमाणात आहे. मुलास आशीर्वाद मानला जातो. त्यांचा वाढदिवस आनंदाने धुमधडाक्यात साजरा केला जातो. परंतु मुलींचे वाढदिवस साजरे केले जात नाहीत. आई-वडील मुलीला ओझे मानतात. 2011 च्या जनगणनेनुसार भारतात 1000 पुरुषांमागे 940 महिला आहेत. म्हणजे पुरुषांपेक्षा महिलांचे प्रमाण कमी आहे. 2011 मध्ये भारतात पुरुषांची साक्षरता 82.14% तर महिलांची साक्षरता 65.46% होती.

भारतातच नव्हे तर जगातील अनेक देशांमध्ये लिंग

विषमता अस्तित्वात आहे. 'द वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम' 2006 पासून जा[illegible] लिंग अंतर वार्षिक अहवालात लिंग अंतर मोजत आहे. जागतिक लिंग अंतर अहवाल राष्ट्रीय स्तरावर लिंग विषमता बंद करण्याच्या प्रगतीचा [illegible] घेतो. फोरमच्या अहवालात स्पष्टपणे प्रतिपादन करण्यात आले की, 'आमच्या[illegible] कोणाच्याही जीवनकाळात खरी लिंग समता बघण्याची शक्यता नाही. [illegible] पिढीला देखील अशाच आव्हानांचा सामना करावा लागेल. सर्वांनी सांगि[illegible] की, जागतिक लिंग समता प्राप्त करण्यासाठी 100 वर्ष लागतील.

निकोलस डी. क्रिस्टोफ :-

ने स्पष्टपणे नमूद केले की, 'एकोणिसाव्या शतकात [illegible] गुलामीचे केंद्रीय नैतिक आव्हान होते. विसाव्या शतकात निरंकुशता किंवा स[illegible] सत्तावादाच्या विरुद्ध लढाई होती. आमचा विश्वास आहे की, या शतकात [illegible] जगभर लिंग समता सर्वात मोठे आव्हान असेल.'

यावर्षी 8 मार्च 2020 रोजी ज[illegible] महिला दिवस साजरा करण्यात आला. आंतरराष्ट्रीय महिला संघटनेची यावर्षी[illegible] मोहिम- 'Each For Equal' अशी आहे. व्यक्ती बदलू शकते. याकडे सर्वां[illegible] लक्ष वेधण्यात आले. पश्चिम युरोपात सध्या सर्वात अधिक लिंग समता [illegible] 76.7% आहे. आणि एक शतक तरी पूर्ण लिंग समता प्राप्त होऊ शकत न[illegible] असे आंतरराष्ट्रीय महिला संघटनेचे मत आहे. "समान जग हे सम[illegible] जग आहे." आपल्यामधील प्रत्येक जण लिंग समता आणण्यासाठी आपले काही करू शकतो. असा 'Each For Equal' या मोहिमेचा संदे[illegible] आहे.

यावरून हे स्पष्ट होते अजूनही जगात लिंग विषमता आहे. लि[illegible] अधिकारांच्या संदर्भात अनेक मुद्दे आहेत. विशेषतः मानवी अधिकारांच्या संदर्भात लिंग भेदभाव, आर्थिक लिंग विषमता, राजकीय लिंग विषमता [illegible] आरोग्य लिंग विषमता हे मुद्दे विशेष महत्वाचे आहे. लिंग अधिकारांच्या

Page No.
Date

लिंग समता आवश्यक आहे' या कल्पनेकडे लोकांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न आंतरराष्ट्रीय महिला संघटन करीत आहे. या मोहिमेअंतर्गत व्यवसाय मंडळे सरकारी विभाग आणि मीडिया कव्हरेज या काही ठळकपणे दर्शविल्या जाणाऱ्या मुख्य बाबी आहेत.

लिंग समता हा एक अधिकार आहे. या अधिकाराची पूर्तता करण्याची चांगली संधी आहे. त्याकरिता कोणत्याही परिस्थितीत महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करणे ही काळाची गरज आहे.

3) राजकीय लिंग विषमता

राजकीय क्षेत्रात महिलांना कोणतेच राजकीय अधिकार नव्हते. मानवी समाजात महिलांचे प्रमाण जवळपास 50% आहे. असे असले तरी त्यांना लिंग विषमतेमुळे राजकीय अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले होते. सर्वप्रथम 1893 मध्ये न्यूझीलंड देशातील महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला. परंतु 1919 पर्यंत त्या निवडणुकीत उभ्या राहू शकत नव्हत्या. अमेरिकेत 1920 पर्यंत महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता. 1920 मध्ये अमेरिकेतील राज्यघटनेत 19 वी सुधारणा करून महिलांना मतदानाचा अधिकार प्रदान करण्यात आला. 1928 मध्ये ग्रेट ब्रिटनमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. 1986 मध्ये स्वित्झरलँड मध्ये राष्ट्रीय स्तरावरील निवडणुकीत स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला. तर 2015 मध्ये सौदी अरबी महिलांना प्रथमच स्थानिक निवडणुकीत मतदानाचा अधिकार मिळाला. भारतात मात्र महिलांना मतदानाचा अधिकार मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागला नाही. भारतीय संविधान समितीने महिलांच्या मतदानाचा अधिकार मान्य करून संविधानात तरतूद केली.

संयुक्त राष्ट्रसंघाने महिलांच्या राजकीय अधिकारांचे कन्वेन्शन 20 डिसेंबर 1952 रोजी मंजूर करून 7 मार्च 1953 रोजी अंगीकृत केले

Page No.
Date

आणि 7 जुलै 1954 पासून लागू करण्यात आले. या कन्वेन्शनचा उद्दे
महिलांच्या राजकीय अधिकारांचा एक मूलभूत आंतरराष्ट्रीय मानकांचे संहि
करणे हे हा होता. हे कन्वेन्शन पहिले आंतरराष्ट्रीय कायदे होते की, ज्या
राजकीय हक्कांचा उपयोग करण्यासाठी महिलांच्या समान दर्जाचे संरक्षण के
त्याशिवाय नागरिकांच्या राजकीय हक्कांच्या संरक्षणासाठी राज्यांना बंधनकारक
हा पहिला आंतरराष्ट्रीय करार होता.

महिलांच्या राजकीय अधिकाराच्या कन्वेन्शनच्या उद्देशपत्रिका किंवा प्रस्ताविकेत मानवाधिकाराच्या सार्वत्रिक घोषणेच्या अनुच्छेद 21 मध्ये दिलेल्या तत्वांचा पुनरुच्चार करण्यात आला.

अनुच्छेद - 21 नुसार प्रत्येकास आपल्या देशातील सार्वजनिक सेवेत समान प्रवेश करण्याचा अधिकार आहे.

Dr. P. S. Sonale

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15